**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 1, Jan – 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 07/01/2021 Accepted on : 16/01/2021 Publication Date: 31/01/2021

# “कोरोना काळामधील ऑनलाईन शिक्षण पद्धतीचे फायदे व तोटे”

**डॉ. सविता ज्ञानेश्वर वावगे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
श्री. मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर, जि. औरंगाबाद
Email - wawgesavita@gmail.com

**सारांश**: कोरोना विषाणूने आपल्या जीवनपद्धतीत अमुलाग्र बदल घडवून आणला आहे. सध्या जगामध्ये कोरोना महामारी थैमान घालत आहे. सरकारने लॉकडाउन केल्यामुळे सर्व कामकाज ठप्प झाले असून, फक्त काही आवश्यक अशा सेवा पुरवल्या जात आहे. आपल्याला हवे किंवा नको असलेले खूप मोठे बदल आपल्या आयुष्यात होत आहेत. वर्क फ्रॉम होम संस्कृती, स्वच्छतेचे नियम, सार्वजनिक ठिकाणी वावरण्याचे नियम हे सर्व आपल्या अंगवळणी पडत चालले आहे. पण त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा एक नवीन प्रश्न उभा राहिला आहे. त्यामध्ये काही परीक्षा या रद्द केल्या व काही या ऑनलाईन घेण्यात आल्या. कारण कोरोना महामारी मध्ये सामाजिक अंतर ठेवणे हे सुरक्षिततेची मानले जाते. सध्याच्या परिस्थितीचा विचार करता शाळा बंद असल्या तरी शिक्षण सुरू राहिले पाहिजे, राज्य शासनाच्या या धोरणानुसारच आज आपण ऑनलाईन शिक्षण पद्धतीने शिक्षण प्रक्रिया सुरुवात तर केली आहे. मात्र याबाबत शिक्षक विद्यार्थी आणि पालक प्रचंड संभ्रमात आहेत त्यामुळे खरोखर ऑनलाइन शिक्षण पद्धती ही पारंपारिक शिक्षण पद्धतीला पर्याय ठरू शकते का? यावर विचार करून सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही बाजूने चर्चा करणे खूप आवश्यक आहे.

**प्रमुख शब्द**: कोरोना, लॉकडाउन, ऑनलाईन शिक्षण.

## १. प्रस्तावना :

कोरोना विषाणू चा प्रादुर्भाव जगात होत असतांना महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रा मधील मुंबई, पुणे व पिंपरी चिंचवड या मोठ्या दळणवळणाच्या शहरामध्ये २० मार्च २०२० पासून लॉकडाऊन सुरे केले, आणि त्या नंतर आपल्या देशाचे मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २४ मार्च २०२० पासून महाराष्ट्रासह देशात २१ दिवसाचा लॉकडाऊन जाहीर केला. आणि त्या नंतर अनेकदा शासनाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव पाहता अनेकदा लॉकडाऊन वाढविला.

कोरोना विषाणूने आपल्या जीवनपद्धतीत अमुलाग्र बदल घडवून आणला आहे. सध्या जगामध्ये कोरोना महामारी थैमान घालत आहे. सरकारने लॉकडाउन केल्यामुळे सर्व कामकाज ठप्प झाले असून, फक्त काही आवश्यक अशा सेवा पुरवल्या जात आहे. आपल्याला हवे किंवा नको असलेले खूप मोठे बदल आपल्या आयुष्यात होत आहेत. वर्क फ्रॉम होम संस्कृती, स्वच्छतेचे नियम, सार्वजनिक ठिकाणी वावरण्याचे नियम हे सर्व आपल्या अंगवळणी पडत चालले आहे. पण त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा एक नवीन प्रश्न उभा राहिला आहे. त्यामध्ये काही परीक्षा या रद्द केल्या व काही या ऑनलाईन घेण्यात आल्या. कारण कोरोना महामारी मध्ये सामाजिक अंतर ठेवणे हे सुरक्षिततेची मानले जाते. सध्याच्या परिस्थितीचा विचार करता शाळा बंद असल्या तरी शिक्षण सुरू राहिले पाहिजे, राज्य शासनाच्या या धोरणानुसारच आज आपण ऑनलाईन शिक्षण पद्धतीने शिक्षण प्रक्रिया सुरुवात तर केली आहे. मात्र याबाबत शिक्षक विद्यार्थी आणि पालक प्रचंड संभ्रमात आहेत त्यामुळे खरोखर ऑनलाइन शिक्षण पद्धती ही पारंपारिक शिक्षण पद्धतीला पर्याय ठरू शकते का? यावर विचार करून सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही बाजूने चर्चा करणे खूप आवश्यक आहे.

अनेकांच्या घरी संगणक नसल्याने लहानग्यांच्या हाती मोबाईल द्यावा लागत आहे. तसेच वर्क फ्रॉम होम करणाऱ्या पालकांना मुलांच्या अभ्यासासाठीही स्वतंत्र वेळ काढावा लागतो. सोबतच वारंवार खंडित होणार विद्युत पुरवठा, नेटवर्क मिळण्यात येणाऱ्या अडचणी, सातत्याने मुलांना मोबाईल समोर बसावे लागत असल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न अशा अनेक समस्या निर्माण होत आहेत.

कोविड 19 ची साथ आणि त्यानंतर जाहीर झालेला लॉंकडाऊन यामुळे देशभरातील सर्व शैक्षणिक संस्था बंद झाल्या,परिणामी भारतातील शाळा व्यवस्था पारंपरिक वर्गामधून डिजिटल प्लॅटफॉर्मवर आलेली दिसत आहे.ऑनलाईन शिक्षणाच्या दिशेने घाईत घेतलेल्या निर्णयामुळे “डिजिटल उपलब्धता “नसलेला एक मोठा वर्ग या आभासी वर्गाबाहेर फेकला

गेला आहे. ऑनलाईन शिक्षण मूठभर विद्यार्थ्यांना मिळत आहे, कारण भारतातील फक्त २४ टक्के कुटुंबाकडे स्मार्टफोन आहे. ५ ते १८ या वयोगटातील मुले असलेल्या केवळ ११.५ टक्के घरांमध्ये संगणक आणि इंटरनेट कनेक्शन आहे.

कोरोना काळामध्ये माणसाची जीवनशैली बदलली प्रत्येकाचे वैचारिक, व्यावहारिक, शैक्षणिक, मानसिक सगळयाच स्वरूपाचे बदल झालेत. त्यापैकी एक महत्त्वाचा बदल म्हणजे ऑनलाइन शिक्षण. शिक्षणाचा उद्देश सर्व बाजूने मिळणारे ज्ञान आत्मसात करणे व त्यातून आपले उत्तम व्यक्तिमत्व घडवणे आहे. यासाठी तंत्रज्ञानाचा जेवढा वापर होऊ शकतो तेवढा अन्य कशाचाही होऊ शकत नाही. ऑनलाईन शिक्षणामुळे विकासाची पुढचे पाऊल टाकले जाऊन विद्यार्थी व शिक्षकांसाठी ज्ञानाचे भांडार उघडले गेले आहे. झुम, गूगलमिट, क्लासरूम आणि काहीजण व्हाट्सअप माध्यमातून ऑफलाइन पद्धतीने शिकवण्याची ही प्रक्रिया राबवत आहे. नवीन काहीतरी शिकायला मिळणार म्हणून एक जिज्ञासा निर्माण होत आहे, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान पद्धत सुरुवातीला खूप छान व परिस्थितीनुरूप सोयीस्कर देखील वाटले. कदाचित शिक्षक-विद्यार्थी दोघांनाही ही वर्क फ्रॉम ची ऑनलाइन एज्युकेशन पद्धती आवडली असेलही पण हे डिजिटल शिक्षण कायमस्वरूपी इलाज होऊ शकते का? की आताच्या अडचणीच्या काळात एक पर्यायी उपलब्धता म्हणून स्विकारलेली एक पद्धत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक विकासाबरोबर शारीरिक व मानसिक विकास देखील खूप महत्त्वाचा आहे. तो आपण ऑनलाईन शिक्षणामध्ये देऊ शकतो का? आणि शिक्षकांच्या दृष्टिकोनातून विचार केला तर प्रत्येक शिक्षकाने तंत्रस्नेही बनले पाहिजे ही काळाची गरज आहे

## २. ऑनलाईन शिक्षणाचे फायदे:

- मुलांना सकाळी उठून तयार करणे, त्यांच्या साठी जेवणाचा डबा बनवणे, आणि त्यांना शाळेत वेळेवर सोडणे, ही कामे टळली असून त्यामुळे पालकांना भरपूर वेळ मिळत आहे.
- विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणामुळे कम्प्युटर, लॅपटॉप, स्मार्टफोन, इंटरनेट, आणि झूम व्यतिरिक्त नवनवीन ॲप्स इत्यादी हाताळण्याचे ज्ञान आले असून त्याचा वापर ते आपल्या वैयक्तिक जीवनात देखील करू लागले आहे.
- ऑनलाईन शिक्षणामुळे तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात देशाची स्थिती आणखी मजबूत होण्यास हातभार लागेल.
- शाळेत जातांना व येतांना होणारे अपघाताचे प्रमाण नाहीसे झाले आहे.
- पूर्वी पाच ते सहा तास शाळा, त्याशिवाय जाण्या येण्यासाठी व शाळेची तयारी करण्यासाठीचा लागणारा वेळ वाचला आहे.
- नवनवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे विद्यार्थांमध्ये ज्ञान अर्जित करण्याची गोडी निर्माण झाली आहे.
- पारंपारिक पद्धतीने शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना ही नवनवीन पद्धतीने तंत्रज्ञान आत्मसात करून विद्यार्थांना शिकवावे लागत आहे. ज्यामुळे तेही संगणक हाताळणी मध्ये पारंगत झाले आहे.

## ३. ऑनलाइन शिक्षणाचे तोटे:

- पालक व मुले अगोदर काही तास सोबत राहत असत पण ऑनलाईन शिक्षणामुळे ते 24 तासात सोबत आहेत. त्यामुळे काही वेळेस थोडाफार वाद देखील निर्माण होतो आणि मुलांमध्ये देखील आळस निर्माण होत आहे, त्यांची सकाळी उठण्याची सवय बंद झाली आहे.
- ऑनलाईन शिक्षणामुळे इंटरनेटचा गैरवापर देखील मुले करत आहे. जसे की ऑनलाइन गेम खेळणे, ऑनलाईन व्हिडिओ पाहणे इत्यादी.
- कम्प्युटर व लॅपटॉपच्या स्क्रीन समोर बसल्यामुळे डोळ्यावर ताण येतो तसेच मान दुखी, पाठ दुखी सुद्धा जाणवते यामुळे विद्यार्थांच्या संदर्भात या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. यामुळे त्यांच्या आरोग्यावर देखील दुष्परिणाम होत आहे.
- डिजिटल शिक्षणामुळे मुले अजून एकलकोंडी होत आहेत. कारण ती एकटीच घरून शिक्षण घेत आहेत. जर हे शिक्षण एका वर्गात असते तर मुलांमध्ये एकोप्याची भावना निर्माण होते. एकत्र शिकल्यामुळे मिळून मिसळून राहण्याची वृत्ती तयार होते. त्यांच्यात मैत्री निर्माण होते. तसेच त्यांना एकमेकांना मदत करण्याची भावना निर्माण होते. पण ऑनलाइन शिक्षणामुळे या सर्व गोष्टी घडत नाही.
- काही विषय हे मुक्त वातावरणात शिकवले गेले पाहिजे, जसे की शारिरिक शिक्षण, पर्यावरण इत्यादी हे विषय ऑनलाइन पद्धतीने शिकविण्यात बऱ्याच अडचणी आहेत.

- ऑनलाईन शिक्षण पद्धती ग्रामीण भागातील जनतेसाठी निरुपयोगी ठरणार आहे, ग्रामीण भागात इंटरनेट उपलब्धता पाहिजे तेवढ्या प्रमाणात विकसित नसल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासुन वंचित राहत आहे.त्यामुळे त्याचे शैक्षणिक नुकसान होणार आहे.
- ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सामाजिक दुरावा वाढू लागेल.
- ऑनलाईन शिक्षणासाठी लागणारी अद्यावत आणि आधुनिक तंत्र आणि सामुग्री ही ग्रामीण भागात सहजरित्या उपलब्ध नाही. अशाने शहरी आणि ग्रामीण भाग यामधील शैक्षणिक सामाजिक दरी वाढत जाणार आहे.

## ४. ग्रामीण भागात ऑफलाईन शिक्षणा संदर्भात काही महत्वपूर्ण उपाययोजना

- ग्रामीण भागामधील शाळेमध्ये सर्व स्तरातील मुले असतात. त्यामुळे त्यांना हे ऑनलाईन शिक्षण घेणे शक्य होईलच असे नाही. त्यामुळे शासनाने व शाळेने सर्वांना सोयीचे होईल अशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.
- ज्या भागामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी आहे अशा भागातील शाळांना काही सामाजिक अंतर च्या संदर्भात अटी घालून त्या सुरु कराव्यात.
- खबरदारीचा उपाय म्हणून ग्रामीण भागातील शाळा दररोज सॅनिटाइज कराव्यात. व गरज भासल्यास शासनामार्फत किंवा शाळेमार्फत मुलांना मास्क वाटप करावेत.

मुलांच्या दृष्टीनेही ऑनलाईन शिक्षणाने आरोग्यावर होणारा परिणाम खास करून डोळ्यावर होणारा सततचा ताण (जी मुलं मोबाईलचा वापर करत असतील) हा गंभीर स्वरूपाचा असणार आहे. या आणि अशा अनेक अडचणी असताना ऑनलाईन शिक्षणाचा अट्टाहास करणे कितपत योग्य आहे?...

## संदर्भग्रंथ सूची:

१. सरकले म.स.,(२०२०) “ऑनलाईन शिक्षण पद्धतीचे काही फायदे काही तोटे”, दैनिक सामना वृत्तमान पत्र लेख, २९ ओक्टोबर २०२०..
२. कदम अमिता, (२०२०) “ऑनलाईन शिक्षणाचे फायदे आणि तोटे”,न्यूज मेकर लाईव, लेख २० ऑगस्ट २०२०.
३. पळशीकर दीपा, (२०२०) “थोडे ऑनलाईन बरेच ऑफलाईन”, दै.लोकमत, लेख, १६ जून २०२०.
४. https://www.youtube.com/watch?v=VBuh5ukKmVA
५. https://www.youtube.com/watch?v=cksc7dfb2i8